**पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.**

93, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक 02162-234130

Email - sp.satara@mahapolice.gov.in

******************************************************************************************

**<u>प्रेसनोट</u>** दिनांक:- १५/०१/२०२६

# ऑलिंपिक वीर स्व. पै. खाशाबा जाधव यांची १०१ वी जयंती पोलीस कवायत मैदान येथे उत्साहात साजरी

**दिनांक १५/०१/२०२६ रोजी स्व.पै खाशाबा जाधव यांचे जयंती निमित्त श्रीमती डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी स्व.पै खाशाबा जाधव यांचे प्रतिमेचे पुजन केले. स्व.पै.खाशाबा जाधव यांचे जयंती निमित्ताने पोलीस कवायत मैदान येथे सुरु असलेल्या सातारा जिल्हा पोलीस क्रीडा प्रबोधिनी चे श्री तुषार दोशी , पोलीस अधीक्षक सातारा व श्रीमती डॉ.वैशाली कडुकर,अपर पोलीस अधीक्षक सातारा यांचे हस्ते स्व.पै. खाशाबा जाधव पोलीस क्रीडा प्रबोधिनी , सातारा असे नामकरण करण्यात आले.**

**स्व.पै खाशाबा जाधव पोलीस क्रीडा प्रबोधिनी मध्ये कुस्ती, बॉक्सींग, ज्युदो, वेटलिफ्टींग, ॲथलेटीक्स, मल्लंखांब, बास्केटबॉल या क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण दिले जात असुन सुमारे ५०० प्रशिक्षणार्थी हे प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षणार्थी यांना श्रीमती डॉ.वैशाली कडुकर,अपर पोलीस अधीक्षक यांनी स्व.पै खाशाबा जाधव यांचे जीवन व त्यांनी केलेल्या ऐतिहासिक कामगीरीबाबत माहिती देवुन भविष्यामध्ये उज्वल कामगिरी करणेची प्रेरणा दिली.**

---

**पोलीस अधीक्षक सातारा करीता**

**प्रति,**

**सर्व संपादक**